स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 16/03/2015** रोजी **दुपारी 04.30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | **मा. श्री. रमेश सिंगारे** | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. शरद बांते | सदस्य |
| 3. | श्री. संजय बालपांडे | सदस्य |
| 4. | श्री. श्रावण खापेकर | सदस्य |
| 5. | श्री. गोपीचंद कुमरे | सदस्य |
| 6. | श्री. जगतराम सिन्हा | सदस्य |
| 7. | श्री. हाजी कामल अंसारी | सदस्य |
| 8. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिध्दीकी, उप निगम आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 03:— प्रभाग क्र. 40 अ गांधीबाग प्रभागातील कुंभारपुरा येथे सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामासतव प्राप्त 6 निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरांपेक्षा 1.5 प्रतिशत ने कमी दरांची रू. 27,87,170/— (अक्षरी सत्तावीस लक्ष सत्यांशी हजार एकशे सत्तर रूपये फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015—16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 04:— दिक्षाभूमी परिसरात सि.सि.टी.व्ही. कॅमेरे लावण्यास्तव मे. टेक्नोकि सोल्युशन्स, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा 12.6 टक्के ने कमी असलेली रू. 62,15,233/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 05:— स्थायी समिती ठराव क्र. 269, दिनांक 21.11.2015 अन्वये, निविदाकाराचे दर प्राकलनीय दर/राशी रू. 9,48,510/— पेक्षा जास्त असल्यामुळे निविदाकाराचे दर कमी करण्याच्या निर्देशा नुसार करण्यात आलेल्या कारवाई अंतर्गत, निविदाकाराने महाराजबाग, सिताबर्डी, नागपूर येथील सुलभ शौचालयाच्या बांधकाम व संचालन कामाकरीता सादर केलेल्या रू. 38,95,898/— च्या प्रस्ताव राशीतून 3 टक्के राशी कमी करण्याची तयार दर्शविली असून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव राशी रू. 37,79,021/— इतकी आहे.

वरील प्रमाणे विभागाद्वारा करण्यात आलेली अनुपालन कारवाई अवलोकनार्थ व यथायोग्य निर्णयार्थ प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सूचने प्रमाणे रू. 37,79,021/– सुधारीत प्रस्तावित राशीचा कार्यादेश देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 06:– स्थायी समिती ठराव क्र. 268, दिनांक 21.11.2015 अन्वये, निविदाकाराचे दर प्राकलनीय दर/राशी रू. 9,48,510/– पेक्षा जास्त असल्यामुळे निविदाकाराचे दर कमी करण्याच्या निर्देशा नुसार करण्यात आलेल्या कारवाई अंतर्गत, निविदाकाराने सिरसपेठ येथील सुलभ शौचालयाच्या बांधकाम व संचालन कामाकरीता सादर केलेल्या रू. 20,01,667/– च्या प्रस्ताव राशीतून 3 टक्के राशी कमी करण्याची तयार दर्शविली असून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव राशी रू. 19,41,617/– इतकी आहे.

वरील प्रमाणे विभागाद्वारा करण्यात आलेली अनुपालन कारवाई अवलोकनार्थ व यथायोग्य निर्णयार्थ प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सूचने प्रमाणे रू. 19,41,617/– सुधारीत प्रस्तावित राशीचा कार्यादेश देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 07:– स्थायी समिती ठराव क्र. 267, दिनांक 21.11.2015 अन्वये, निविदाकाराचे दर प्राकलनीय दर/राशी रू. 11,38,212/– पेक्षा जास्त असल्यामुळे निविदाकाराचे दर कमी करण्याच्या निर्देशा नुसार करण्यात आलेल्या कारवाई अंतर्गत, निविदाकाराने प्रजापतीनगर चौक, रिंग रोड येथील सुलभ शौचालयाच्या बांधकाम व संचालन कामाकरीता सादर केलेल्या रू. 20,01,667/– च्या प्रस्ताव राशीतून 3 टक्के राशी कमी करण्याची तयार दर्शविली असून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव राशी रू. 19,41,617/– इतकी आहे.

वरील प्रमाणे विभागाद्वारा करण्यात आलेली अनुपालन कारवाई अवलोकनार्थ व यथायोग्य निर्णयार्थ प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सूचने प्रमाणे रू. 19,41,617/– सुधारीत प्रस्तावित राशीचा कार्यादेश देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 08:– प्रभाग क्र. 26 अंतर्गत झॉसी राणी चौक ते लोहापूल चौक (पंडीत मालविया) पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 81,98,638/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 370 ( A22001330801) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 09:– प्रभाग क्र. 14 अ आणि ब कुंदनलाल गुप्ता नगर व पाठराबे वाडी येथे रस्त्याचे डांबरीकरण व रूंदीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदा पैकी मे. पी.के. कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 4.9 प्रतिशतने अधिक दराची रू. 31,46,011/– (एकतीस लक्ष छेहेचाळीस हजार अकरा रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रू. 29,99,057/– पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015–16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 10</u>:— प्रभाग क्र. ६२ —ब, भोलेबाबा नगर, श्रीरामनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. प्रेमचंद राचूमल यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.०० प्रतिशत ने अधिक दराची रू. ३७,९९,२०६/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015—16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.
कार्यादेश राशी प्रशासकीय मान्यता राशीच्या मर्यादेत सिमीत ठेवण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 11</u>:— प्रभाग क्र. 40 अ गांधीबाग प्रभागातील बुध्दू खॉ मिनारा येथे सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 6 निविदांपैकी मे. ब्रिन्दा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरांपेक्षा 18.1 प्रतिशत ने कमी दरांची रू. 28,74,724/— (अक्षरी अट्ठावीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार सातशे चोवीस रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015—16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 12</u>:— प्रभाग क्र. 23 मधील विविध रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम.गोपलानी यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 5.00 प्रतिशत अधिक दराची रू. 31,49,943/— (अक्षरी एकतीस लक्ष एकोणन्नास हजार नऊशे त्रेचाळीस फक्त) दराची निविदा मंजूरी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015—16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 13</u>:— प्रभाग क्र. ४८ व ४९ मध्ये तुकडोजी महाराज चौक ते क्रिडा चौक पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. फोनिक्स इंजिनिअरींग, यांची प्राकलनीय दरापेक्षा ४.६६ टक्के अधिक दराची रू. १,७२,००,८९७/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या प्रस्तावित कामाचे कार्यादेश सुधारीत अर्थसंकल्पात प्रावधान उपलब्ध असल्यास करावे जर प्रावधान उपलब्ध नसल्यास सन 2015—16 च्या अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून प्राथम्याने देण्यात यावे या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.
कार्यादेश राशी प्रशासकीय मान्यता राशीच्या मर्यादेत सिमीत ठेवण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 14</u>:— प्रभाग क्र. 41, येथे गांधी कन्या म.न.पा. शाळेच्या जागेवर स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकामास्तव रू. 2,57,86,885/— रकमेच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे तसेच स्थापत्य कामाकरीता या कामाचे मुळ मंजूर निविदाकार मे. सी.व्ही. नायडू, यांना त्यांचे मंजूर दरावर उर्वरीत रू. 67,97,795/— रकमेचे कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापतीः— काल नागपूर शहरामध्ये फार मोठया प्रमाणात गारांचा आणि वादळाचा पाऊस झाला. मोठया प्रमाणात गाराचा आणि वादळाचा पाऊस झाल्यामुळे मा.महापौरांनी यांनी सुचना केली की नागपूर शहरामध्ये कोणकोणत्या झोन अंतर्गत किती नुकसान झाले. झाडे पडून कुठे कुठे ट्राफिक थांबले, कुठे कुणाची जीवहानी, किती आर्थिक हानी, नुकसान झाले आहे. याबाबत निजी सहाय्यकाने सर्व झोनच्या सहा.आयुक्तांना सुचना केली. कोणत्या भागामध्ये कशाकशाप्रकारे नुकसान झाले आहे याची माहिती देण्यात यावी. मला फक्त चार झोनच्या सहा.आयुक्तांनी माहिती दिली. हनुमाननगरचे सहा.आयुक्त श्री.हुमणे, मंगळवारी झोनचे सहा.आयुक्त श्री. वराडे, धरमपेठ झोनचे सहा.आयुक्त श्री.कराडे आणि गांधीबाग झोनचे सहा.आयुक्त श्री.भिवगडे यांनी माहिती दिली आहे. बाकी झोनच्या सहा.आयुक्तांनी या सुचनेला दाद दिली नाही. मी ही फार गंभीर गोष्ट समजतो. यानंतर निश्चितपणे स्थायी समिती सभापती असो, महापौर असो यांनी दिलेल्या सुचनेची निश्चितपणे लापरवाही होणार नाही याची दखल घेण्यात यावी. कालच्या गारा आणि वादळाच्या पावसामुळे अनेक ठिकाणी मोठे नुकसान होण्याची संभावना होती. कोणकोणत्या झोन अंतर्गत झाडे पडून ट्राफिक थांबलेले होते. ते उचलण्यात आले नाही प्रभागात अशा प्रकारची घटना घडली असेल तर त्याची माहिती सभागृहात देण्यात यावी.

सहा आयुक्त(लक्ष्मीनगर झोन क्र. 1):— मा.सभापती, 3 पोल रिंगरोडवरती पडले होते ते कालच उचलण्यात आले. आज एक पोल सद्भावना ग्राऊंडमधे पडलेला होता तो हटविण्यात आला आहे.

सभापतीः— आता परिस्थिती कशी आहे. यातायात सुरू झाले आहे काय?

सहा आयुक्त(लक्ष्मीनगर झोन क्र. 1):— मा.सभापती, सगळे ठीक आहे.

सहा आयुक्त(धरमपेठ झोन क्र. 2):— मा.सभापती, ट्राफिक कुठेही अडलेले नाही. काल रात्रीच सर्व व्यवस्थित केलेले आहे.

सभापतीः— आयुक्त साहेबांना याची माहिती दिली आहे काय?

सहा आयुक्त(धरमपेठ झोन क्र. 2):— मा.सभापती, जुना रेल्वेपुल येथील जयस्तंभ चौकात मोठया प्रमाणात पाणी साचले होते. काल खुप प्रयत्न केल्यावरही पाणी निघाले नाही तेव्हा फायरबिग्रेडची मदत घेवून पाणी काढावे लागले. नरेंद्र नगरचा पुलाला जसा प्राब्लेम येतो त्याप्रकारे या रेल्वेपुलाची अवस्था होईल. हा पुल तोडून नवीन पुल बांधल्यास काही अडचण राहणार नाही. नाही तर याबाबत काही तरी व्यवस्था करावी लागेल.

सहा आयुक्त(हनुमाननगर झोन क्र. 3):— मा.सभापती, काल संध्याकाळी सव्वा सहा, साडे सहावाजेच्या दरम्यान पाऊस पडल्यामुळे प्रभागातील दोन तक्रारी प्राप्त झाल्या. तक्रारीचे निराकरण केलेले आहे आणि आयुक्त महोदयांना याचा रिपोर्ट पाठविला आहे.

सहा आयुक्त(धंतोली झोन क्र. 4):– मा.सभापती, प्रभागात झाड पडल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. मी रात्री झोन परिसरात राऊंडला होतो.

सहा आयुक्त(सतरंजीपुरा झोन क्र. 7):– मा.सभापती, काल मा.सदस्य श्री.डोरले यांच्या प्रभागात पाणी जमा झाले होते. त्यांनी मला फोन केला. त्यांनी केलेल्या तक्रारीचा निपटारा केला आहे. प्रभागात कुठेही पोल किंवा झाड पडलेले नाही.

सहा आयुक्त(लकडगंज झोन क्र. 8):– मा.सभापती, टेलीफोन एक्सचेंज चौकात पाणी जमा झाले होते. पाण्याचा निचरा केलेला आहे आणि आयुक्तांना सुध्दा रिपोर्ट पाठविला आहे.

सहा आयुक्त(मंगळवारी झोन क्र. 9):– मा.सभापती, कालच्या पावसामुळे ज्या ज्या ठिकाणी पाणी जमा झाले होते ते क्लिअर केले आहे.

सहा आयुक्त(आसीनगर झोन क्र. 10):– मा.सभापती, झोन अंतर्गत राऊंड घेतला कुठेही प्राब्लेम नव्हता.

सभापती:– भुसारी साहेब आणि सिद्दीकी साहेब आपल्याला प्रशासनासोबत संपुर्ण शहरासाठी काम करावयाचे आहे. त्यामुळे शहरातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने ज्या काही गोष्टी असतील त्याची दखल घेतली गेली पाहिजे.

ठराव क्रमांक 15 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर